## नियमित दिवाणी दावा क. 256/2014 मधील निशाणी क. 19 खालील आदेश

1. विचाराधिन अर्ज हा वादी/अर्जदार क्र. 1 ते 4 तर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश 6 नियम 17 व आदेश 22 नियम 3 अन्वये दाखल केलेला आहे. अर्जदारांच्या कथनानुसार प्रस्तुत प्रकरणातील वादी क्र. 1 पांडूरंग संदीपान आघाव हे दिनांक 17/11/2015 रोजी मयत झालेले आहेत व त्यांना खालीलप्रमाणे एकुण चार वारस आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | मोहरबाई पांडूरंग आघाव | पत्नी | रा. खडकोणी, ता. बार्शी, ह.मु. दहिफळ |
| 2 | प्रियंका पांडूरंग आघाव | मुलगी | रा. सदर |
| 3 | प्रमोद पांडूरंग आघाव | मुलगा | रा. सदर |
| 4 | प्रमिला पांडूरंग आघाव | मुलगी | रा. सदर |

अर्जदार क्र. 2 ते 4 अज्ञान अ. पा. क. आई अर्जदार क्र. 1 मोहरबाई पांडूरंग आघाव

2. नियोजित दुरूस्तीआधारे अर्जदार क्र. 1 ते 4 हे मयत वादी क्र. 1 चे वारस म्हणून समाविष्ठ करणेबाबत विचाराधीन अर्जाद्वारे विनंती केलेली आहे. सबब, अर्जदार यांनी विचाराधिन अर्ज दाखल केलेला आहे.

3. सदर अर्जास प्रतिवादी यांनी अर्जाच्या पाठीमागे म्हणणे दाखल करून हरकत व आक्षेप घेतलेला आहे.

4. मी दोन्ही बाजूंतर्फे युक्तीवाद ऐकलेला आहे.

5. प्रस्तुत दावा हा वादीने, प्रतिवादी यांच्याविरूध्द मालकी हक्काची घोषणा व निरंतर मनाई मिळणेबाबत तसेच संदीपान दादा आघाव यांनी प्रतिवादीच्या नांवे तारण म्हणून करून दिलेले दावा मिळकतींचे खरेदीखत रद्द होवून मिळणेबाबत दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणातील वादी क्र. 1 हा दिनांक 17/11/2015 रोजी मयत झालेला आहे व वारस अभिलेखावर घेण्याबाबतचा अर्ज हा दिनांक 10/12/2015 रोजी दाखल केलेला आहे. म्हणजेच सदर वारस अभिलेखावर घेण्याबाबतचा अर्ज हा मुदतीत दाखल केलेला आहे. वादी प्रतिवादी मधील वाद अंतिमतः संपुष्टात येण्यासाठी मयत वादी क्र. 1 चे वारस दाव्यात समाविष्ठ होणे आवश्यक आहे. परिणामतः खालील आदेश.

## <u>आ दे श.</u>

1 विचाराधिन अर्ज हा मंजूर करण्यात येतो.

2 वादीने आवश्यक ती दुरूस्ती पुढील तारीखेस अथवा तत्पुर्वी करावी व इतर आवश्यक त्या बाबींची पुर्तता करावी.

सही
( अ. अ. भोसले ),
सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
**भूम.**

दिनांक : 16/02/2016.